म. ग्रं. सं. ठाणे

विषय

१९१

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

सं. ही. [illegible]

श्री.

२२२ । १८

नि ८२

# पत्तन प्रभु लेखमणि.

ह्मणजे

स्व ज्ञाति विषयीं जीं श्री वेदव्यासप्रसाद-याणीं त्याजवर जगन्मान्य गुरूचीं संमती पत्रें मागें झालीं आहेत त्यांचा हा संग्रह केला आहे.

स्पष्ट महाराष्ट्रभाषेंत

शामराव मोरोजी.

याणीं

मुक्काम मुंबई.

शके १७८४.

श्री

॥ गौरीनियततत्वं सकलमुनिमतं वेदवेदांतवेद्यं ॥
साक्षात्कैवल्यरूपं विधिहर नमितं भोगमोक्षप्र
दंच ॥ सत्यं ज्ञानादिरूपं प्रकटितमकरोद्ब्रह्मनि
र्वाणमेकं ॥ वंदेहं सेवकानामखिलसुखकरं शं
कराचार्यमूर्तिम् ॥ १ ॥

तच्चरणा झेनें
हा लहानसा ग्रंथ
आरंभिला
तत्पददास सेवक-
कर्ता.

॥ मिति श्रावण शुक्लपक्ष १४
आणि इंदुवार शके १७८३
अंगिरानाम संवत्सरे

# प्रस्तावना

यापूर्वी श्री हरि सत्तेनें एक ग्रंथ केला-" क्षत्रियवंशोद्भ समाला" या नामें करून तो तर सकल क्षत्रिय वर्ण उगमा चा झाला. आणि आतां स्वज्ञाति उगमादिकांचा मात्र होय, याचें करण्याचें कारण असें झालें कीं. यामागें आपले ज्ञाती विषयींची साधनें पत्रें ग्रंथ इत्यादिक किती होतीं, आणि आतां पहा किती आहेत. परंतु तीं तर सर्व श्रीस च्छंकर स्वामीचे आज्ञापत्रीं लिहिलीं आहेत याजमुळें त्या साधनपत्रादिकांचा मी लघुशोध केला. त्यांतम लाजीं पत्रें इत्यादिक सांपडलीं, तीं यथानुक्रमें लावून व त्यावर विद्वज्जनाचे साह्यानें श्री सह्याद्रि खंडांत लें आठ अध्यायाचें संकलित स्वदेशभाषांतर स- प्रमाण दाखवण्याकरितां त्यांतील कांहीं श्लोक घेऊ न केलें आहे. त्यांसचें श्रीमन्महाभारत हरिवंश व भागवतांतलें भविष्य ही लिहिलें आहे. कांकीं सकलस त्कृत संमतपत्रीं तोच मजकूर आहे. आणखी मागले कित्येक विद्वान् पंडितांहीं या प्रभुज्ञाती विषयीं अने क सिद्धांत निर्णय संस्कृतग्रंथांतून काढून केले आहे त. त्यांतील कांहीं वचनें घेऊन हें सकल क्षत्रिय वृत्त जाणण्याकरितां लिहिलें आहे.

आंतां त्या कृत्याचे आरंभींच प्रभूहीं जगद्गुरूसवि
नंती केली आहे अशीकीं "आमचा, अवघा निर्णय
"कशांत आहे तो कृपा करून सांगावा" याचें कारण-
असें मागें झालें होतें कीं महादुष्ट यवन हिंदुधर्मध्व
तक असे होत त्यांचें अति प्राबल्य झालें याज मुळें त्यां
प्रभूंस पूर्वदेश सकटून दक्षिण देशीं अतिसंकट रूपें यावें
लागलें त्याज मुळें तेव्हांही आठवण या प्रभूस राहि-
लीनाहीं. ह्मणून प्रभूहीं तशी विनंती केली

आतां आपले प्रत्येक स्वज्ञाति गृहस्थांचे घरीं त्या
संमत पत्रादिकांचा संग्रह असावा असा माझेमनीं आ
लीकडे हेतु उत्पन्न झाला याजमुळें हा लहानसा यत्न
केला यांत न्यूनाधिक कांहीं असत्यास स्वज्ञाति गृ
हस्थाहीं क्षमा करावी जशी देवसेवा आपण करितों
आणि तो देव आपणावर दया घन होतो तद्वत्.

श्री

# ॥पत्तनप्रभुलेखमणि॥

श्रीगणेशायनमः॥ तो असा कीं श्री जगद्गुरू आदिविद्वज्जन ब्राह्मण या प्रभूंचे ज्ञातीविषयीं कसा काय उत्पत्तीचा शोध सांगतात. आणि त्यांहीं कर्मकांडाचे वहिवाटी करितां मागील लेख कसे केले आहेत ते लिहितों.

शके १६४८ चे वर्षी श्रीविद्याशंकरभारती हे मुंबईस आले होते तेव्हां जे प्रभू होते, ते सर्व मिळून त्या स्वामीस प्रार्थना करिते झाले, ते असे कीं– "स्वामी आह्मी श्रीसूर्यवंशी क्षत्रिय आहों, आणि त्या वर्णाश्रम धर्मेकरून अद्यापि चालतों. व लिहिण्यांत असें लिहितों कीं. आपलें नाव गोत्र आणि उपनाव अमुक आहे परंतु हा अवधानिर्णय कोणते ग्रंथांत आहे तो स्वामीहीं कृपा करून आह्मास सांगावा ?–" तेव्हां स्वामी ह्मणाले कीं," हें तुमचें सकळ सविस्तर कथन श्रीसह्याद्रिखंडीं आहे :– असें ते बोलून त्यांणीं संमतपत्र करून दिलें तें हें.

श्रीशृंगेरीपूर मठकर शंकर स्वामींचें हें प्रथम-संस्कृत संमन षष्ठ श्लोकी पत्र १

श्रीविद्याशंकर


॥ श्री ॥
विद्याशं
कर

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्यपद
वाक्यप्रमाणपारावारपारीणयमनियमा
सनप्राणायामप्रत्याहारध्यानधारणास
माध्यष्टांगयोगानुष्ठाननिष्ठागरिष्ठतप
श्चक्रवर्त्यनाद्यविच्छिन्नगुरुपरंपराप्रा
प्तषड्दर्शनस्थापनाचार्यव्याख्यानसिं
हासनाधीश्वरसकलवेदार्थप्रकाशक-
सांख्यत्रयीप्रतिपालकसकलआगमनि
गमसारहृदयवैदिकमार्गप्रवर्तकसर्वतं
त्रस्वतंत्रादिराजधानीश्रीविद्यानगरमहा
राजधानिकर्णाटकसिंहासनप्रतिष्ठाप
नाचार्यभूरिचारिसांप्रदायांपरमादिवा
राहदेवताराधकश्रीमद्राजाधिराजगुरु
पृथ्वीधराचार्यतुंगभद्रातीरनिवासऋ
ष्यशृंगपुराधीश्वरविजयभवः

श्रीमत्परमहंसयतींद्रप्रतिपालनाधारमतध्वंसअ
रिमर्दनकर्षणमतस्थापनषड्गुणैश्वर्याढ्यसकल
वेदार्थप्रसंगनिपुणहृदयवैदिकमार्गप्रमनीयचातु

र्यमस्युपायांचितांगसिंहासनार्थिताजिह्वाचातुर्यदर्श
गुणवल्कलाशेषफणितनिद्याशंकराचार्यगुरुवरसांप्र-
दायांपरशृंगेरीमठवरपट्टभद्रप्रासविद्यानगरपीठभा
ग्यसहिताभव्यगुणसांद्राशंकरभारतेंद्राः

नानादुष्टनिवासभूमितलमाभञ्जेतपाथोनिधौ।।उद्धर्तुं
जगदीश्वरापरवपुःसंधारयन्नामतः।।विद्याशंकरभारती
नवसुधाशृंष्वेष्वत्रमंसूर्वदा।।ग्राम्याणांमुखमर्दनाविजयतेज्ञा
नांधकारापहा।।१।। वर्षेचैवपराभवेगजसुगारातीक्ष्मासं
मितं।।ह्रीतेचैत्रसितेगुरुप्रभुकुलेप्रभुः कृतःसादरं।।नत्वा
शंकरमंबिकांगुरुवरंश्रेष्ठंजगन्मानितं।।विद्याशंकरभारती
यतिवरोब्रूतेसभायाःस्थितिः।।२।।मुंबापुरंसमागम्यास्थितवा
न्कतिचिद्दिनं।।भिक्षार्थंवैसमाकूतंप्रभुभिःस्वगृहंप्रति।।३।।
शृंगेरीमठमध्येतुत्वस्तिसह्याद्रिखंडकं।। तत्रप्रभुकुलोत्प
त्तिंपाठारीयातिविस्तराम्।।४।। सूर्यवंशोद्भवस्तावत्पाठारी
यास्तुबाहुजाः।।षट्कर्मकारिणोविप्राःक्षत्रियास्तत्रिकर्म
णि।।५।।यजनाध्ययनंदानंसर्ववैदिकमार्गजम्।।इतिसत्य
मिदंवाक्यंविद्याशंकरभारती।।६




* हेपत्रशाके१६९८चैत्रशु।।२गुरुवारीजाहालें
* हीकुर्णीटची अक्षरें मुद्रा आहे.

आतां ह्या पत्रावरून ह्या सह्याद्रिखंडाचे ग्रंथाचा शोधक-
रण्याकरितां दीर्घकाळ लागला. तो असा कीं सुमारें चाळीस-
पन्नास वर्षें जाहलीं. शेवटीं शके १७०१ चे वर्षीं श्रीनृसिंहभा-
रती व श्रीशंकरभारती स्वामी हे उभयतां करवीर मठकरयां-
स त्या प्रभूंहीं पूर्ववत्प्रमाणे ह्मणजे प्रथमसंमतपत्रासारि-
खी विनंती केली कीं - "आमचे जातीचा उगम ज्या ग्रंथीं आहे
" तो ग्रंथ आह्मास द्यावा -" त्या काळीं त्याहीं तोच सह्याद्रिखं-
डाचा संक्षेपाधार सांगून, ह्मणजे तिसरे संमतपत्रासारिखें
स्वमतपत्रीं लिहून सिक्यानशीं करून दिलें. तें पुढें १७०९
चे वर्षीं, त्यास सह्याद्रिखंडाचे ग्रंथासहित या प्रभूंहीं श्रीशं-
करस्वामीस दाखविले. असें त्यांचे पांचवें आज्ञापत्रीं लि-
हिलें आहे तें हें दुसरें पत्र.

श्रीकरवीरमठकर शंकरस्वामी यांचें हें दुसरें संस्कृ-
तसंमतपत्र ॥ २

०॥ श्री ॥०
अनेकशक्तिसंघट्ट
प्रकाशलहरीधनः
ध्वांतध्वंसो विजयते
विद्याशंकरभारती

श्रीशंकर.

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचा-
र्यारिषड्वर्गदमनपूर्वकसद्गुण-
गणाभूषणभूषितपदवाक्यप्र-
माणपारावारपारीणयमनि-

यमासनप्राणायाम प्रत्याहार-
ध्यान धारणासमाधिपराष्टांग
योगाचिरपक्षतिसंततसादर
तत्परतपश्चक्रवर्तित्वावच्छि
न्नसकलदुष्टशिक्षापूर्वक-
शिष्टाचारश्रुतिस्मृत्यनुस्मर
णसद्धर्मवर्त्मसंप्रदायप्रवर्त
काचार्याऽखिलदुर्वासनादि
मनखंडनत्वावच्छिन्न षण्म
तस्थापनाचार्यानाद्यविच्छि
न्नगुरुपरंपरागतनिखिल वे
दवेदांतशास्त्रप्रणीत प्रसं-
गोपम व्याख्यान पांडित्या
वच्छिन्ना व्यारूढ़जषड्गुणैश्व
र्य संपन्न श्रीमत् शंकेश्वरा
दिमठसिंहासनाधीश्वर-
श्रीयतिवर करकंजजश्री
श्रीनृसिंहभारतींद्राः सर्व
गुरवः ॥ श्रीशांकरभारतिय-
श्री

सकलविद्वद्वृंदादिनिखिलाधिकारिजन प्रति नाराय
णस्मरण पूर्वक नैरंतर्याविच्छिन्न मंगल चिंतनाशि
षयंति भो जना अस्मत्समीपे पाठारीय प्रभुजाति
विचारोयमभूत्॥ स्कंद पुराणे आदिरहस्ये स-
ह्याद्रिखंडे गणेशेश्वर संवादे षड्विंशति सकाशा
त्पंचत्रिंशत्तिपर्यंता ध्याय मध्ये योवस्तु तदनुसारे
ण॥ कोसौ भावो येन विचार इत्याकांक्षायां तत्रा
य श्लोकाभिप्रायः॥" श्रीरामवंश्यः कश्चनाश्व
॥पतिर्नामा भूपस्य सुताआसन् भृगु प्रसादेन भरद्वा
॥जादि विश्वामित्रांत द्वादश ऋषिभ्यः सकाशात्
॥ द्वादश मंत्राणामुपदेशो भूत्॥ तत्प्रभावेन द्वा-
॥ दशगोत्रजाः द्वादश पुत्रा अभवन्॥ ततो वंश वृ
॥ द्धिरभूत्॥ सतीर्थयात्रा प्रसंगेन पैठीणसी पत्त
॥ ने दानादि कर्तृत्वाभि निवेशेनागतस्यापि गुरोर्नस
॥ न्मानितं॥ तेन कारणेन भृगुणा शप्तस्तेवंश नाशः
॥स्यादिति॥ पश्चाद्विनय पूर्वक तत्प्रार्थनेन प्रसादि
॥ तः सद्गुरुः ममवाक्यं न वृथा स्यात्॥ परंतु तव श
॥ रण प्राप्तत्वाच्च॥ त्वद्वंश्याश्चे वराजानो निर्वीर्याश

//ज्यहीनगाः ।।आद्यं प्रभुत्वं तेषांवैलिपिकाजीवनं
// भवेत् ।। पाठारीयाः प्रसिद्धास्ते पत्तनाख्याभवंतु
// वा ।। प्रभूत्तरपदं तेषांपत्तनाःप्रभवश्चते इति ।। //
एतेन तेषांस्वसामान्य स्वरूपान्वय विपूर्वक पाठा
रीय प्रभुत्वाख्या सामान्यांतर प्राप्तत्वात् ।। वेदो
क्तानुसार श्रीमत्पाराशर्यज वर्त्मानुसरणं यागा
दियजनं षट् कर्म निरतं निमित्तीकृत्य वेदसमाख्या
ध्ययनं यथोक्तपथासीया दान प्रतिग्रहेच्च सर्वे
प्येते नसंत्येवं त्यतः क्षत्रियास्त्रिकर्मिण इत्येत-
दुप्रेक्षया तेषां वेदोक्तानुसरण व्यासभव माग-
मोक्त कर्मचतुष्टयाधिकारोस्तीति सर्वमिदंविमृश्यं
विशेषोनुवदते त्यस्मदाज्ञा निश्चयेनेवावगंतव्या
।। श्रीरस्तु ।। विकार्यब्दशुचि सिते द्वादश्यांबुध
वासरे ।। एतत्प्रभु वचोभिश्च सद्वचोभिर्विलेखनं ।।
आज्ञेयमुल्लसति

इत्य-
लम्

+ ह्मणजे १७०१ होत

फ आषाढमास शुद्धपक्ष १२ बुधवारीं हें संमनप
त्र झालें.

तदनंतर त्या शंकर स्वामी हिं स्वमठांतील तो च सह्याद्रिखंड ग्रंथ त्या प्रभूंस दिला ( याविषयीं मीं लघु शोध केला. त्यांत मला याग्रंथाच्या आठ प्रती सांपडल्या. त्यांत दोन ग्रंथ तीनतीन शें वर्षांचे भाग ले होते. त्यांतही खालीं लिहिल्या प्रमाणें या पत्तन प्रभूचें कथन एकसारिखें त्यासर्वांत आहे. ते चारी वर्ण ब्राह्मणादिकरून सर्व हिंदूचे उत्पत्तीचें मूळ कारण ग्रंथ होत. आणि तेच चतुर विद्वज्जन ब्राह्मणास मान्य आहेत त्यांतला या प्रभूंचे वंशा विषयींचा वेंचा काढून त्याचा मराठी भाषेंत संकलित अर्थ विद्वज्जनां जवळून करवून येथेंमीं लिहितों. तो असा आहे कीं— श्री स्कंद पुराणीं आदिरहस्यीं सह्याद्रिखंडीं श्री महादेव गणपति प्रश्नोत्तरीं श्लोक बद्ध संस्कृत आठ अध्याय वर्णिले आहेत त्यांत

॥श्रीसूर्योत्पत्ति॥

याचा अध्याय २६ वा. त्याचे श्लोक ६९ आहेत. त्यांत असें आहे कीं श्री महादेव गणपतीस ह्मणतो प्रथम

॥ श्लोक॥

अतःपरंप्रवक्ष्यामिमाहात्म्यंश्रुतिसंमतं॥

पाठारीयप्रभूणांवैउत्पत्तिंकथयामिते॥१॥

अर्थ— असाकीं पाठारीय प्रभू यांचीउत्पत्ति तूंज सांग तो. तीही पुढील कथा संस्कृत भाषेंत. त्या अध्यायींअ शी वर्णिलीआहेकीं— "प्रथमारंभीं श्रीब्रह्मदेवाचे मा "नसपुत्र कश्यपादि ऋषी झाले. त्या कश्यपास पुत्र श्री "सूर्य होय. त्याचा सातवा पुत्र श्री वैवस्वत मनू होता. " याचे वंशीं श्रीरघु-अज- दशरथ- हे झाले. त्यास श्री "रामचंद्र हा सातवा अवतार श्री हरीचा होय. यास श्री "कुश- अतिथि- नैषध- नल- नभ- पुंडरीक- क्षेमध "न्वा- देवानीक. वासी- दल-शील- यी- ऊयाम- वज्र "नाभ- खंडन- व्युषित- विश्वसम- हिरण्यनाभि- कौ "शल्य- सोम- ब्रह्मिष्ट- पुष्प- सुदर्शन- अनीवर्ण- व "क्षेम" असे एकामागें एकपुत्र झाले.

आतां त्या क्षेमक राजास अश्वपति पुत्र होता तो अपुत्र ह्मणून सर्व ऋषि संमत्तें पुत्र कामेष्टि याग केला सकल दानें श्री ईश्वरार्पण केलीं. तेव्हां श्री नारायण प्रसन्न होऊन ह्मणाला कीं "राजा तुझी पुत्र कामना- "श्री भृगु ऋषी पुरवील—" ह्मणून भृगूस त्या राजानें

प्रार्थना केली. भृगूनें मनांत विचार केला. तो असाकीं
"प्रति सूर्यासारिखे बारा महान् महान् ऋषि बसले-
"आहेत त्यांस वर्जून मीं या राजास आशीर्वाद देईन
"तर ते मजवर कोपतील याज करितां त्या बारा ऋषीं
"स बारा मंत्र सांगून आशीर्वाद राजास देवविला."-
त्या ऋषींचे नावाचे २ श्लोक.

भरद्वाजः पूतमाक्षो वसिष्ठः कश्यपस्तथा
हरितो वृद्धविष्णुश्च तथाब्रह्मजनार्दनः १९
सोनल्यः कौंडिनश्चैवमांडव्यः कौशिकस्तथा
विश्वामित्रऋषिश्चैषोद्वादशैते प्रकीर्तिताः २०

त्या ऋषींचे इष्टदेवतेच्चे नावाचे दोन श्लोक

प्रभावती कालिका च चंडिका च नतः स्मृता॥
महालक्ष्मीरिति प्रोक्ता तथा योगेश्वरीतिच २१
इंद्राणींचैव कामाक्षी एकवीरांबिका तथा॥
माहेश्वरी तथा दुर्गा त्वरिता त्वनुपूर्वशः २२

त्या आशीर्वचनें करून बारा पुत्र त्या राजास झाले त्यां
चे नावाचा १॥ श्लोक

अनुजो देवकश्चैव पृथुर्वैक्रतुपर्णकः॥ ज
यः कशिष्णुः सोवामः कमंतुः कौंडिनस्तथा २३

मंडूकः कौशिकश्चैवमार्तंडश्चततःस्मृतः॥

आतां त्यो बारा पुत्रांस वरील ऋषीचींजीं नावें तींत्यां चींगोत्रें. आणि त्या ऋषींच्या इष्टदेवता त्या त्यांच्या कुळदेवी होत. त्यांचें कोष्टक अंक१ शेवटीं लिहिलें आहे.

याची वंशपरंपरा एका मागें एक अथवा अनेक पुत्र. नातु पणतु इत्यादि या भूमंडळीं चालता हेत-

त्यांचाश्लोक

तेषांपुत्राश्चपोत्राश्चप्रसूतावैमहीतले॥

कथितंतेमयापुत्रमाहात्म्यंवंशसंभवं.६८

असें त्या २६वे अध्यायीं निरुपण केलें आहे.

---

॥श्रीसोमोत्पत्ति॥

याचे ५ अध्याय २९ पासून ३३ पर्यंत मिळून होत. त्याचे श्लोक ४११आहेत त्यांत असेंआहेकीं.

श्रीमहादेवगणपतीसह्मणतो..श्लोक.

शृणुवत्सप्रवक्ष्यामिचंद्रवंशंप्रविस्तरं॥

यंश्रुत्वावंशवर्यंहिविस्मयोजायतेनृणां॥५

अर्थ— चंद्रवंशाची उत्पत्तीस विस्तर सूज सांगतों

तीहीपुढील कथा संस्कृत भाषेंत अशी वर्णिली आहे
कीं "त्या श्री कश्यपास अत्रि ऋषी पुत्र झाला. त्या-
"स चंद्रमा झाला. त्याचा पुत्र बुध. त्याचा श्री पुरूरवा.
"त्यास नपु- अनुज- आयुरी- त्रपुर्वाम. कुश. भानु
"सोम- शिरस- धनंजय- मांगल्य- पंगुयास १००
"शत पुत्र झाले. त्याचें आख्यान आहे. त्यांत रवि
"मंडळ प्रथम- त्यास नृपजित- सर्वजित- रघु-
"माघ- इंदु- धृष्टद्युम्न- धर्म- काम- कौशिक-
"रणमंडण- सिध्मी- बागलालन- वज्र- इंदुमंड
"ण- कामपाल- सलील- धर्मध्वज- काशीश्वर-
"भूषण- कांति- पृथु- "असे एकामागें एक पुत्र झाले

आतां त्या पृथुराजास श्री कामपति पुत्र होता-
तो अपुत्र ह्मणून त्याणें सर्व ऋषींच्या संमत्तें अश्व
मेध केला नंतर पुत्र कामेष्टि केलि सकल दानें श्री
ईश्वरार्पण केलीं. तेणें करून श्रीनारायण रूपसन्न
होऊन स्वमुखें अठ्याहात्तर मंत्र बोलला. ते सबी-
जमंत्र ऋषींनी ह्मणून राजास आशीर्वाद दिला-
त्या आशीर्वादें करून राजास अठ्याहात्तर पुत्र झा
ले. त्यांस त्या प्रत्येक ऋषींचीं जीं नावें तीं त्यांचीं गोत्रें.

आणि त्यां ज्याज्या देवता त्या त्यांच्या कुळदेवी होत. इत्यादि॰" हें सकल वर्णन वरले सूर्य वंशा प्रमाणें
" होय. असें निरूपण या सोम वंशाचें आहे- "त्यांनू नजे कोंकणांत क्षत्रिय आले आणि प्रस्तुत जांचे वंश या प्रभू ज्ञातींत चालतात. त्यांचेंच मात्र एक कोष्टक अंती अंक २ हें पाहावें. यांत न्यूनाधिक कांहीं असल्यास मज वर स्वज्ञाति ग्रहस्थांची क्षमा असावी- यांची वंश परंपरा एकामागें एक अथवा अनेक पुत्र नातु पणतु इत्यादि या भूमंडळीं चालता हेत त्यांचा एक श्लोक.

एवंवंशस्य विस्तारं सूर्यचंद्रमसोर्नरा:॥
कीर्तयिष्यंत्यनुदिनं शृण्वंति च स्फ भक्तित: ६९

असें त्या पंचमाध्यायीं निरूपण आहे.

॥ पत्तन प्रभू अथवा पाताणे प्रभु शब्दार्थ-॥

याचा अध्याय २७ वा त्याचे श्लोक १७ असत. त्यांत असे कथन आहे कीं. श्री महादेव गणपतीस ह्मणतो- जो पूर्वोक्त श्री अश्वपति या नामें करून सूर्यवंशींचा राजा सांगितला त्यास श्री भृगु ऋषीचा शाप कसा झाला तें कारण तुज सांगतों. तो राजा कोणे ए-

के काळीं श्रीपेठणास तीर्थयात्रा निमित्तें गेला होता तो तेथें तुलापुरुष दानादि करीत आहे. इतुक्यांत त्या संधीस श्रीभृगुमुनी तेथें आले. त्यांस राजानें अर्घ्य पाद्यादि पूजा व संमान केला नाहीं याज मुळें मुनीस क्रोध येऊन शापदिला त्याचा दीड श्लोक.

राजश्रियामदोन्मत्तंराजानंचशशापह॥
पूर्वोपकारिणंमांत्वंदुष्टस्मरसिनप्रभुः॥७॥
तस्मात्त्वंराज्यहीनोभूर्वंशनाशोभविष्यति॥

याचा अर्थ असाकीं" हेराजा तूं राज्य लक्ष्मीनें मदोन्म
" त्त जाहाला आहेस. व माझा मागील तूं उपकार विस
" रलास तस्मात् तुझें राज्य जाईल आणि निर्वंश हो
" ईल- " असें तो मुनी बोलतांच राजानें स्वकीय अप
राधजाणून शरण झाला आणि त्यास ह्मणाला कीं-
" आपणास कसामी स्मरणार नाहीं यास प्रमाण अ
" सेंआहे कीं पहा. आपण माझे वंश वृक्षाचे उत्पन्न क-
" र्ते असतां नाशक कसे व्हाल. ह्मणून कृपा करून उ-
" शाप मज द्यावा " एवढीं मुनीनें त्या रायाचीं वचनें-
ऐकतांच उशाप दिला त्याचे तीन श्लोक.

त्वंमेशरणमापन्नोवंशवृद्धिर्भविष्यति॥

रव द्वंशजाश्चराजानोनि:शौर्याराज्यहीनगा:॥१३
अद्यप्रभृतितेषांवैलीपिकाजीवनंभवेत् ॥पे-
ठाणेपत्तनेशप्ता मया कोपवशात्किलौ पा
ठारीयाप्रसिद्धास्ते पत्तनाख्याभवंतुच ॥ प्र
भूत्तरपदंतेषांपत्तनाप्रभवश्चये ॥ १५ ॥

अर्थ— राजा तुझा वंशमात्र पुढें राहील. त्यास रा
"ज्य नाहीं. आणि ते शौर्यहीन होतील. व लेखन वृत्ति
"नें ते जीवनोपाय करितील. आणि राज्य पद जाई
"ल ह्मणून जें प्रसिद्ध पाठारीय प्रभू हें प्राचीन नाम-
"आहे. त्याचें ते पत्तन प्रभू नाम पावतील." एवढें
ते भृगुमुनी बोलोन निजाश्रमीं गेले. असें त्या २७
वे अध्यायीं कथानक आहे.

आतां पाहा या अध्यायांत "पत्तन प्रभू" असें नाम कथन आहे त्याचें "पाताणे प्रभू" असा उत्तरोत्तर त्या नावाचा अपभ्रंश झाला आहे. यास प्रमाण पहा पूर्वी या स्थानास— "मंबाक्षपुर" असें मुळचें नाम होतें त्याचें आतां "मुंबई—" असें नाव हांजग प्रसिद्ध झालें. तद्वत् हा अपभ्रंश झाला. राज वर्ण ह्मणून प्रभू नांव आदिचें होतें तें हें आहे. राज्यपद

गेलें ह्मणून- "पातापेो" नांव झालें.आणखी यावर निर्णयसिद्धांत श्री शंकर स्वामीनें त्यांचे पांचवे आज्ञापत्रीं केला आहे. तो पहा ह्मणजे संशय जाईल.

---

॥अखंड क्षत्रियवंशविचार॥

आंतां पाहा श्रीमद्भागवताचे ९मस्कंधाचा १२व्या अध्यायचे शेवटले १५ वे श्लोकीं भविष्य कथन आहे कीं "इक्ष्वाकु वंशीं सुमित्र राजा होईल तेथवर राज्य व वं "श राहील ह्मणून" आणि श्रीमत् हरिवंशाचे १४ वे अध्यायाचे २७ वे श्लोकीं अशी कथा आहे कीं-"इक्ष्वा "कु वंशींचे सगर राजानें अश्वमेध केला त्यास श्रीआ "दिनारायण सुप्रसन्न होऊन वर दिधला असा कीं तु "झा वंश अक्षय राहील."

आणखी पाहा त्याच भागवताचे १२ वे स्कंधीं पहिले अध्यायाचे आरंभीच अशी कथा आहे कीं. "श्री कृष्णजी निजधामास गेल्यावर मागधाचे वंशीं "चा शेवटला रिपुंजय नामें राजा जो त्यास मारून शु "नक प्रधानानें आपले पुत्रास राज्यासनीं बसविला "त्याचे पांच पुरुष झाल्या नंतर शिशुनाग राजा झाला

+ ह्या ग्रंथ भक्ति प्रमाणा चा होय.

"त्याचा राहावा पुरुष महानंदि होय त्यापुढें दासीपुत्र
"राज्यीं बसतील इत्यादि" असें त्या अध्यायीं कलियु-
गांतील भविष्य सांगितलें आहे.

आतां पहा त्यावरल्या काळीं क्षत्रियांचीं शाण्णव-
कुळें स्वतंत्र पणें भिन्न भिन्न नांवानें चालत होतीं त्यांत-
लेच हे वरले कांहीं क्षत्रिय होत. परंतु जें सह्याद्रिखंडां
तलें अश्चपतीचें. व कामपतीचें वंशकथन आहे त्यां-
चें हें वरलें भागवनाचें निरूपण नव्हे. कांकीं ते निराळे
शाण्णव कुळांतले वंश श्रीसूर्य व सोमोत्पत्ती ह्मणून चा
लताहेत. हे सूज्ञजन हो तेपहा ह्मणजे हा संदेह जाई
ल. आणखी कलियुग झालें ह्मणजे त्या वंशाचा निःपा
त किंवा निर्वंश होईल. अथवा त्या सकळ वंशास एक
दांच श्री नारायण स्वपदीं मुक्ती देईल. जशी रामचंद्रा
नें संपूर्ण अयोध्या मुक्तीस नेली. असा पुराण प्रसिद्ध-
कोठें ही या वंशाविषयींची कथा आढळत नाहीं

---

## ॥ श्रीवसिष्ठधर्मोपदेश. ॥

आतां पहा त्याच वरले सह्याद्रिखंडाचा ३५ वा अध्या
य त्याचे श्लोक ९३ आहेत त्यांत कथन असें आहे कीं.

श्री महादेव गण पतीस ह्मणतो कीं श्री वसिष्ठ ऋषि कसा क्षत्रियांस उपदेश करतील तो तुज सांगतों. जें आतां क्षत्रि यांचें बहुधा अयोध्ये कडे वास्तव्य आहे त्याक्षत्रियांचें कलियुग झालें ह्मणजे पुढें. राज्य व शौर्य हीं भृगूच्या शापानें जातील. नंतर त्यांची वस्ती पैठणास होईल नंतर तेथून कोंकणांत जातील. शास्त्र निंदा व ब्राह्मणनिंदा आणि अनेक पापयुक्त. मिथ्यावाद. हे मात्र वृद्धिंगत होतील. आणि त्या कलि युगास्तव पाप रूपी भूमी होईल ह्मणून सर्व ऋषि बदारिकाश्रमीं जातील त्यासमयीं वसिष्ठ सर्व क्षत्रियांस उपदेश करितील. त्याचे २ श्लोक-

मम वंश कुले जाता मम गोत्र समुद्भवा:
त्वां गुरुं मानये त्सर्वे पूजयेद्विधि पूर्वकम् ११
यजु: शाखा स्व कर्माणि सूत्रं कात्यायनं स्मृतं ॥ स्व कर्म श्रुति संयुक्तं कुर्याद्राज्यं यथाविधि १२

अर्थ— "पुढें माझे वंशीं जे ब्राह्मण होतील त्यांस तुह्मीं मज समान मानून स्ववर्णाश्रम धर्में विधियुक्त पूजावें. आणि यजुर्वेदी कात्यायन सूत्रानें कर्म चालवावें "आणि कार्याकारण विचार करुन राज्य नीति इत्यादि

" करीतजावें " असें तो मुनी त्या वेळीं त्या क्षत्रियांस सांगून अंतर्धान पावतील.

एवढेंच त्या सह्याद्रि खंडाचे आठ अध्यायांत पत्तन प्रभु क्षत्रियांचें वर्णन आहे. त्याचे एकंदर श्लोक ५१० आहेत.

आतां अनादि सिद्धरीत तर अशी चालत आली आहे कीं- " श्रीसूर्य व सोमवंशी क्षत्रिय मिळून एक-
" जाती होय " - असें श्रीमन्महाभारतीं वर्णन आहे.

## ॥ विद्वज्जननिर्णयसिद्धांत. ॥

आतां " थोर थोर पंडितांचे निर्णय- " असें श्रीशंकरस्वामीचे पांचवे आज्ञापत्रीं लिहिलें आहे तें पाहा- त्या निर्णयांतून मीं अति संक्षेप भावार्थ येथें घेतला. कां- कीं आपले ज्ञाती विषयीं विद्वज्जन ब्राह्मणांचें काय सिद्धांत ह्मणणें आहे. ह्मणून ते असें ह्मणतात कीं हिंदूचे चारी वर्णास सकल वेद शास्त्र व पुराणें हीं प्रमाण आहेत तदनुसार उघड पाहा कीं. " श्री परशुरामानें दुष्ट क्षत्रियांचा मात्र निःपात केला. नंतर राम. कृष्ण हे अ-
" वतार जाहले. आणखी कौरव. पांडव. यादव. शकक

"र्ता विक्रमादि करून शतावधि क्षत्रिय राजे व त्यांचे वं-
"शज या हिंदुस्थानभर या कलियुगीं चालतात"— या-
विषयीं तर श्रीआदि नारायणाचें वरद वाक्य निरूप
ण. श्रीमत् हरिवंशीं आहे तें वचन हें पाहा.

प्रादाच्च तस्मै भगवान्हरिर्नारायणो वरम्
अक्षयं वंशमिक्ष्वाकोः कीर्तिंचाप्यनिवर्तिनीं १

याचा अर्थ असा कीं-"अखंड क्षत्रियवंश इक्ष्वाकूचा
"राहील इत्यादि".

आतां क्षत्रियांचीं शाण्णव कुळें मोजितात तीं ये
णें प्रमाणें.

| | | | |
|---|---|---|---|
| "श्रीभ्रवकुल— | १ | "श्रीकामपतीचीं कुळें- | ७८ |
| "रघुकुल—— | १ | "यदुकुल. ———— | १ |
| "जनककुल — | १ | "कुरु किंवा पंडुकुल — | १ |
| "अश्वपतीचीं कुळें | १२ | "रामबिंबकुळ—— | १ |
| | १५ | | ८१ |

मिळून संख्या ९६ होतात.

आतां क्षत्रियांचें आदिदैवत्य तर-"श्रीविष्णु" आहे.
याविषयीं प्रमाण श्लोक.

विप्राणां दैवतं शंभुः क्षत्रियाणां तु माधवः॥

वैश्यानांतु भवेद्ब्रह्मा शूद्राणां गणनायकः १
असे मनूचें वाक्य आहे. एवढेंच या मनुस्मृतींत आहे काय? तर नाहीं– " सकलक्षत्रिय वर्णा विषयींनिरूपण आहे. इत्यादि– " आणि तें न्याय व नीतींत मान्य करितात. या प्रमाणें विद्वज्जनांचा सिद्धांत आहे.

---

आतां करवीर मठकर शंकर स्वामीचें दुसरें संमती पत्रा सारिखें आधार त्याच सह्याद्रि खंड ग्रंथा वरून- घेऊन पुनः शके १७ १० चे वर्षी गुर्जर देशिक शिष्ट एकूणचाळीस ३९ ब्राह्मण मिळून स्वमतें लिहून पत्र केलें तें पहा.

श्रीमत्सूर्यपुरस्थ शिष्ट गुर्जर ब्राह्मणयांचें हें तिसरें संस्कृत संमत्पत्र लिहितो. – यांत ला इतर ज्ञातीचें निर्णयाचा वेंचा जो त्या संमत्ती विषयीं लिहिला आहे तो मी येथें सोडिला कांकीं त्या ज्ञातीशीं व आपले ज्ञातीशीं कांहीं संबंध नाहीं ह्मणून व त्या जागीं *. *. *, अशीं चिन्हें केलीं आहेत. ३

श्री

॥ शिवशरणम् ॥

अस्ति दक्षिणस्यां दिशि प्रभुपदवाच्याः * . * .
* . तत्र पत्तन प्रभूणां तु संस्काराचार जीविका संदेह
प्राप्तेः श्रीस्कंदपुराणांतर्गत सह्याद्रिखंडे पर्यालोच
नया निर्णयः तद्यथा पत्तन प्रभूणां पाठारीय ज्ञाती
नामंतर विषये श्रीगणपति प्रश्ने महादेवो त्तरम् यथा
" श्री अश्वपतिर्नामभूपः सूर्यवंशः पैठणे दानादि प्रसंगे
" न व्यासक्तः समागतं भृगुमुनिमपि न संश्चकार, ततो
" भृगुः राज्य हानि वंशनाशाभ्यां तं शशाप, ततो राजाऽनु-
" निं सोपगतः कोपो मुनिस्तमनुजागृहं, उवाच मुनिश्रे
" ष्ठो राजानं दानतत्परम्. राजन्मे न वृथा वाक्यं भविष्य
" ति न संशयः, त्वं मे शरणमापन्नो वंशवृद्धिर्भविष्यति,
" त्वद्वंशजाश्च राजानो निःशौर्या राज्यहीनगाः, अद्य प्रभु
" त्वं तेषां वे लिपिकाजीवनं भवेत्, पैठाने पत्तने शप्ता म-
" या कोपवशात्किल, पाठारीया प्रसिद्धास्ते पत्तनाख्या
" भवंतु च, प्रभूत्तरपदं तेषां पत्तना प्रभवश्चये इत्यादि"
वचो निश्चय विचारेण पाठारीय प्रभूणां परंपर्याणां प
त्तनप्रभूणां शद्ध क्षत्रियत्वं जातिमत्तया क्षत्रिय वर्ण-
विहिताचार संस्कारादिकं सर्वं भवत्येवेति प्रति भाति-
यद्यपि क्षत्रियाणामायुः प्रधानजीविकेति क्षत्रियस्य-

जीविता इति वाक्येन धर्मनिर्बंधेषुविहिता तथापिलिपिकाजीवनंभवेदिति भृगुवाक्येन तामपोह्य लीपिकाजीविकेतिदिक् किंच क्षत्रियायां गर्भाधानादिसंस्कारादिकं ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्रा मुख्यवर्णास्त्वाद्यास्त्रयो द्विजाः निषेकाद्याःस्मशानांतास्तेषांवैमंत्रतःक्रियाः इत्यादियाज्ञवल्क्यादिवचोभिःसमंत्रकायंभवंतिइति इज्याध्ययनदानादिवैश्यस्यक्षत्रियस्यच इत्यादियाज्ञवल्क्यवचनंप्रतिपादितंसंगच्छेत्'' श्रीमत्सूर्यपुरेविहिताश्चप्रकाशानंदेनसंमतीः तत्समयेश्रीमन्नृपविक्रमार्कसंवत् १८४४ तथाच नृपभूप शालिवाहनकृत शके १७१० कीलकनाम संवत्सरे शुभकारिज्येष्ठमासेकृष्णपक्षेतिथौ ७गुरोवासरे गुर्जरब्राह्मणस्य संमतं ·

| | |
|---|---|
| १ आनंदभट्ट काशीवासी शास्त्रीसंमति | १ हरिश्चंद्रेणधर्मपत्रस्थसं- |
| | १ शिवानंदेनसंमतिः |
| १ भाउभट्टसुतेनदादाभट्ट महाराष्ट्रज्ञातीसंमतिः | १ लक्ष्मीधरसुतनारायणसं० |
| | १ रघुनाथभट्टविहितास्यसं० |
| १सदानंदवेकुंठशास्त्रीसंम० | १ नानाबावाभट्टस्यसंम० |
| १जयकृष्णानुजेनसदानंद | १ धोलारव्यस्यसंमतिः |

कृतशास्त्रीकस्मंमतिः
१ आनंदग्रामस्थबुधाख्य शास्त्रीकसंमतिः
१ श्रीमत्सूर्यपुरस्थेन शङ्कु हरिशंकरेण औदीच्य- ज्ञातीयस्यसंमतिः
१ भट्टत्रिविक्रमस्यकुक्षि पुरवासीसंमतिः
१ जगन्नाथपंडितभार्गव ज्ञातिसंमतिः
१ रामनगर करसोमेश्वर मोक्कालीकज्ञातिसंमतिः
१ खादिरस्थदेवकृष्णाशार्म कस्यसंमतिः
१ रामनगरकररामदेव- स्यसंमतिः
१ नगरस्थधनेश्वरभट्टस्यसं
१ नगरस्थ कल्याणजीभ ट्टस्य संमतिः

१ शिवशंकरशास्त्रीपंड्या ख्यस्य संमतिः
१ विजयपुरस्थशिवरामस्य संमतिः
१ मणिग्रामस्थ रामेश्वर नारायणस्यसंमतिः
१ मणिग्रामवासीकिका- ख्यस्यसंमतिः
१ मणिग्रामस्थभिवाविश रामस्य संमतिः
१ देवग्रामवासीकृष्णजोगी नस्य संमतिः
१ जलालपुरस्थ नथुवाख्य स्यसंमतिः
१ खलिलग्रामस्थजीवन- महीधरस्यसंमतिः
१ कंडोलीग्रामस्थशिवराम स्यसंमतिः
१ जंबुपुरस्थभूदेवशङ्कुस्यसं-

| | |
|---|---|
| १ धर्मपुरस्थयदुराम मोदज्ञातिसंमति: | १ जंबुपुरस्थ जीवनस्य संमति: |
| १ त्रिविक्रमस्यमुक्तिपुरभट्टस. | १ जंबुपुरस्थविश्वेश्वरश०. सं |
| १ रघुनाथभट्टमोदज्ञातिसं० | १ गंगाधरात्मजेनगोपालसं. |
| १ उखायापुरस्थशंभुराम मोसं. | १ मिदामदाख्यमोदज्ञातिसंमति: |
| १ योगेश्वरभट्टस्यसंमति: | |
| १ अक्रूरपुरस्थस्य मित्राख्यभट्टस्यसंमति: | एकंदर २१ संमती आहेत. |

या संमत पत्रांतले कित्येकांचे माग ले तीन चार पुरूष परंपरेचे दर एकाचे झाले. त्यांस असे माहीत आहे की "हे प्रभू शद्रू क्षात्रिय" ह्मणून आहेत.

असे गुर्जर ब्राह्मणांचें संमत पत्र झाल्यावर त्याच दिवशीं दुसरें एक स्वतंत्र संस्कृत संमतपत्र. श्रीमद्विद्यानृसिंहभारती करवीर मठकर यांहीं तसेंच लिहून (ह्मणजे वरले पत्रा प्रमाणें लिहिलें) वर्नेशिक्यानिशीं केलें हेंच वर्थे संमतपत्र ह्मणविताहे. तें मीं एथें लिहीत नाहीं कारण कीं. एकट्याच शंकरस्वामीचीं संमत पत्रें झालीं आहेत असें कांहीं नाहीं. इतर ब्राह्मणांचीं ही आहेत ह्मणून ते गुर्जर-

ब्राह्मणाचें पत्र लिहिलें आणखी त्या शंकरस्वामीचें प
त्रीं तर तोच मजकूर तसाच लिहिला आहे, यास्तव तें-
मीं येथें सोडिलें.

आतां याचे एक वर्ष आदि ह्मणजे शके १७०९ चे
वर्षी दुसरीं दोन संमत पत्रें या मुंबई मुकामीं झालीं. त्यां
त एक श्रीमज्जगद्गुरूचें मराठी भाषेंत आज्ञापत्र स-
मस्त ब्राह्मणांस व पेशव्यांस लिहिलें आहे तें हें पहा.

श्रीमच्छंकरस्वामीचें हें आज्ञापत्र ५ पांचवें.

श्रीविद्याशंकर.

| |
|---|
| ०॥।ॐ<br>शृंगेरीश्री-<br>विरूपाक्ष<br>विद्याशंक<br>रभारती: |

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य वर्य प-
दवाक्य प्रमाण पारावार पारीण यम
नियमासन प्राणायाम प्रत्याहार ध्या
न धारणा समाध्यष्टांग योगानुष्ठान
निष्ठागरिष्ठ तपश्चक्रवर्त्यनाद्यविच्छि
न्नगुरुपरंपराप्राप्त षड्दर्शनस्थाप-
नाचार्य व्याख्यान सिंहासनाधीश्वर सकलवेदार्थ
प्रकाशक सांख्यत्रयी प्रतिपालक सकल आगम निग
मागमसार हृदय वैदिक मार्ग प्रवर्तक सर्वतंत्र स्वतंत्रा
दिराजधानी कर्नाटक सिंहासन प्रतिष्ठापनाचार्य श्री-

मद्राजाधिराजगुरुभूमंडळाचार्य तुंगभद्रातीरनि-
वास ऋष्यशृंगपुराधीश्वर शृंगेरी विरूपाक्षश्रीवि
द्याशंकर देवदिव्य श्रीपादपद्माराधक शृंगेरी विरूपा
क्षश्रीपदभिनवोदंड नृसिंह भारती स्वामीनां कर
कमल संजात श्रीमदभिनवविद्यारण्य भारतीस्वा
मिभिः

श्रीवेदशास्त्रसंपन्न पारावाराभिज्ञेषु पुण्यनगर
प्रभृति तद्देशनिवासिषु तथा मुंबापुर व वसई प्रांता
श्चागर राजापुर कुडाळ प्रांत प्रभृति कोंकणवासेषुनि
खिल विद्वद्वृंदादि यांसि आज्ञा केली ऐशीकिं हे पाताणे
प्रभु बहुत वर्षे या प्रांतात राहातात यांचे येथे पूर्वापर
सुरळीत्त कार्य प्रयोजनें चालत असतां यांचे शत्रु वर्गा
हीं यत्न करून गैरवाकबा समजाऊन यांचे विरुद्ध पु-
ण्याहुन पत्र आणिलें परंतु यांचा न्याय व शोध को
णहीच मनास आणिला नाहीं उपरांत किंत्येक ब्राह्म
णाहीं आपले ठिकाणीं शोध करितां त्यांची निशा झा
ली कीं—"येरवीं हे पाताणे प्रभुखरे यांजकडे सळ
"टका आरोप ठेवितात." या वरून पुनः पूर्ववत का
र्य प्रयोजनें मुंबईत श्रीमंत पेशवे यांचे राज्यांत वा

ले लागली. यानंतर पुनः शत्रूनीं उभारणी केली· त्यावरून राजश्री शंकराजी केशव सुभेदार प्रांत वसई यांहीं किती एक ब्राह्मण वसईस मेळविले परंतु पाताणे प्रभु यांसि बोलाविले नाहीं वयांचें मूळ ही शोधिलें नाहीं उगेच शत्रुवर्गाचे सांगित त्यावरून मुंबई व माहीम कर ब्राह्मणासि पत्र लिहिलें कीं– " यांचे घरीं कार्य प्रयोजनें चालवावयासि न जावें–" मग राजश्री रामाजी महादेव सुभेदार प्रांत साष्टी यांणीं उरणचे मुकामीं तपासितां· त्यांची निशा झाली कीं" सारा गैर वारवा आहे. त्यावरून ब्राह्मणासि आज्ञा केली कीं–" स्वरूप पाताणे प्रभूंचे घरीं जावें व पूर्ववत कार्य प्रयोजनें संपादीत जावीं " त्याप्रमाणें ब्राह्मण वसई प्रांतांत व साष्टी प्रांतांत तथा मुंबईस वर्तणूक करीत गेले यासि किती एक वर्षें जाहालीं यावर पुनः शत्रु शहरपुण्यास जाऊन गैर वारवा समजाऊन श्रीवेदमूर्ति सकल शास्त्र संपन्न राजमान्य राजश्री रामशास्त्री यांचे खोटें पत्र समस्त महाराष्ट्र ब्राह्मण मुंबई व माहीम कर यांसि आणिलें कीं– " पाताणे प्रभू·

"यांचे घरीं ब्राह्मण जातात ते ज्ञाति विरहीत—" येणे करून पाताणे प्रभु बहुत श्रमी झाले, निमित्य कीं निरर्थक शत्रु वर्गांचे सांगितल्या वरून व शास्त्र संमत नपाहातां असलेंच लिहितात. कांजर हे दुर्बळ लोक व नित्य सेवक. किती वाद सांगतील. असे ते श्रमी होऊन त्याणी मज कडेस विनंती केली कीं— आमचा पुर्ता शोध करून जो निर्णय चित्तास येईल ती आज्ञा करावी. त्यावरून पाताणे प्रभूयांची साधनें पाहातां सह्याद्रि खंडीं यांची उत्पत्ति सविस्तारें आहे. ती अवलोकन केली. तथा वंशावळ्या पुरातन आहेत. त्याही मनास आणिल्या व यांची चाल व नांव पुरातन सर्व प्रांतांत प्रसिद्ध असें आहे कीं पाताणे प्रभु दुसरे कोणे एके ज्ञातीस हें नाव आइकण्यांत आलें नाहीं व यांचे गुरूस राजगुरू प्रसिद्ध ह्मणतात व वरकड ज्ञातीचे गुरू आहेत. त्यांस तर गुरू अथवा गुरूगोसावी ह्मणतात. यानंतर श्री शंकराचार्यस्वामी कोल्हापूरनिवासी यांचा निर्णय सिक्यानिसी अवलोकन केला. तथा थोर थोर पंडितांचे निर्णय अवलोकन केले. तथा राजा बिंबाचे वेळींचीं ताम्र पत्रें आहेत. तीं अव-

लोकन केलीं. हें सर्व मनास आणितां आज्ञा केली ऐसी कीं– " हे पानाणे प्रभु सूर्य व सोम वंशी क्षत्रिय खरे य
"र कुड यांज वर शत्रुत्वें व राज्य मद्दें लटकाच आरोप-
"भेविनाल तो खचीत लटका आहे. यांचे घरीं सर्व ब्राह्म
"णानीं जाऊन कार्य प्रयोजनें संपादित जावीं–" संवत् १८४२ शके १७०९ प्लवंग नाम संवत्सरे अश्वीन शुद्ध १० रवौ. इति नारायणस्मृतिः

\+ ही कर्नाटकी अक्षरी मुद्रा आहे.



आतां त्या पत्रीं जे "थोर थोर पंडितांचे निर्णय अ
"वलोकन केले" असें लिहिलें आहें त्यांतले तीन निर्णय तर मीं पाहिले. काय हो? त्याहीं मोठा श्रम घेऊन संस्कृत ग्रंथांतील प्रमाणें वेंचे काढून ते निर्णय केले आहेत. त्यांतला आदीच मीं या कुल्या विषयीं अति संक्षेप अर्थ– " विद्वज्जन निर्णय सिद्धांत " यानावा खालीं लिहिला आहे पहा पृष्ठ १९. आणि आतां मीं त्या निर्णय कर्त्यांचीं नावें येथें मात्र सांगतों.

१ श्रीवेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री विश्वनाथ भट्ट उपनाम राईरकर."

२ श्रीवेदशास्त्र० रा० श्रीरामशास्त्रीउपनाम कोनकर
३ श्रीवेदशा० रा० श्रीघनश्यामशास्त्रीउ० जड्ये.

---

यानंतर याच दिवशीं ह्मणजे वरले आज्ञापत्राचे मितीचे दिवशी श्रीमुंबापूर कर समस्त शिष्टमहाराष्ट्र ब्राह्मण १६ सोळा मिळून एक स्वतंत्र संमतपत्र मराठी भाषेंत केलें तें हें

श्रीमुंबईपुर कर महाराष्ट्र ब्राह्मणांचें हें साहावें ६ संमतपत्र.

तें असें कीं सकल वरला मजकूर शंकरस्वामीचे मराठी आज्ञापत्राचा तसा सविस्तारें लिहून व पाहून पुढें आणखी त्यापत्रीं त्याहीं अधीक असें लिहिलें कीं— " हे पाताणे प्रभु खरे शद्धक्षत्रिय आहेत. " असें आह्मांस बरें ठाऊक आहे हे आमचे परंपरेनें ह्मणून संमतें करितों."

| | |
|---|---|
| १ बाळंभटशेंड्येसहीसंम | १ बालकृष्णभटपटवर्धनस. |
| १ बापूभटविवलकर स० | १ भास्करबल्लाळभट सं० |
| १ नारायणभट शेंड्ये सं० | १ बापूभटओळकर सं० |
| १ काशिनाथभटच्छत्र्येसं. | १ गणेशभट्टपराडकर सं० |

| | |
|---|---|
| १ कृष्णाजी आपाजीभट्टसं. | १ बापुभट फडके सं. |
| १ विश्वनाथ काशीकर सं. | १ गोपाळविश्वनाथभट्ट सं. |
| १ नारायणभट छत्रे. सं. | १ लक्ष्मणभट्टमाडरवोळकर |
| १ कृष्णभट्टवैद्यचांदवडकरसं. | सही संमत. |
| १ बचंभटपराडकर संमत | एकंदर १६ संमते आहेत. |

## ॥ प्रभूंचे वादाचा शेवट ॥

आतां श्री वेदशास्त्रसंपन्नराजमान्य राजश्री. घनःश्याम शास्त्री उपनाम जड्ये हे मुद्दाम सर्व प्रभूंचीं साधनें जीं शंकर स्वामीचे आज्ञापत्रीं लिहिलीं आहेत तीं समागमें घेऊन पुण्यास गेले आणि श्रीमंत सवाय माधवराव पेशवे यांस सभेंत दाखविलीं त्याणीं तीं पाहातांच श्री शंकरस्वामी जगद्गुरूचे त्या आज्ञापत्रास अभिवंदन करून प्रभूंचे शत्रुवर्गास स्पष्ट सांगितलें कीं— "तुमचा सकळ वाद खोटा आहे—" असें ह्मणून आणि या शास्त्रीदादास ह्मणाले कीं— "श्री शंकर स्वामीचें आज्ञे प्रमाणें सद्रूप या प्रभूंचे पुरोहिताहीं सर्व कार्य प्रयोजनें पूर्ववत्प्रमाणें प्रभूंचे घरीं चालवावीं.

"इत्यादि-" परंतु त्यावेळेचे राजमदांतले फडनेविसा+दि करून होते त्यांस हें बरें झालें असें वाटलें नाहीं. कांकीं यांच्या पोटीं आदीचा डंश होय ह्मणून. त्याचा उघड तर असा आहे कीं. हा वाद उत्पन्न होण्याचें मुख्य कारण कोणातें झालें ह्मणाल तर तें पाहा-"मागें फिरंगीरा"ज आज्ञे वरून हे प्रभू-- सकल ब्राह्मण आदि क"रून जैजन प्रजा त्यावेळेस संमुख सांपडत त्यास-"सरकारी वेठीस धरीत-" असा हा फिरंग्यांचा बलात्कार होत्साता हे मुद्दाम प्रभू आल्यास वेठीस नेतात. असा हा वाजा वाहिमा या प्रभूवर घेतला होता-असें पूर्व वेर पेशव्यांचे मनीं स्मरत होतें- यावर शके १६६५ चे वर्षापासून जे या प्रभूंचे शत्रु असत. त्यांचे सांगीवर पेशवे बाळाजी बाजीराव इत्यादि कांहीं त्या वेरामुळें न्याय व राजनीति शास्त्र न पाहातां वेळो वेळा पुण्या हून पत्रें शिक्यानिशीं सकल ब्राह्मणांस लिहिलीं होतीं. तीं अशीं कीं "या प्रभूघरीं "पूर्ववत्प्रमाणें कार्यप्रयोजनें करूं नये इत्यादि-"

---

+ ह्मणजे राजश्री बाळाजी जनार्दन भाऊ ऊर्फ नाना फडनवीस

त्यांतील हाल्लीं कांहीं पत्रें लोकसंग्रहीं उपलब्ध आहे
त आणखी त्या वैरामुळें राजमदानें पेशव्यांहीं कित्ये
क प्रभूंस तर देहांत प्रायश्चित्त दिलें. कांकीं हे आप
ले प्रजारूप आहेत त्यांची दाद कोठून लागेल ह्मणू
न– असे स्वधर्मार्थी मागें हे प्रभू बहूत कष्टी झाले.
आणि आतां तर त्या दुःखाचा विसर या प्रभूंस पड
ला आहे– अद्यापि त्या मतानुसारी कांहीं ब्राह्मण
आहेत. परंतु तो वाद तर दोन वेळा आटीच तुटला
प्रथम तर ब्राह्मण ब्राह्मणांहीं मिळून निर्णय के-
ला. नंतर पुनः राजश्रीरामाजी महादेव स्रुभेदार
याहीं उरणाचे मुकामीं भरसभेंत निःपक्षपातानें
न्याय केला. आणि आतां श्रीशंकर स्वामिहींतर त्या
वादाचाउघड शेवट फडशा केला तो पाहा त्यांचे-
त्या आज्ञापत्रीं. आणखी धर्मसंबंधी तर श्रीजग
द्गुरु संमति पुढें इतर संमती रद्द होत. कांकीं त्यांचें
संमत जगन्मान्य आहे ह्मणून. याजकरितां त्या-
शास्त्री दादाहीं या प्रभूंचा धर्माधिकार त्या पेश-
व्यांस दाखवून व त्यांजवळून त्या भरसभेंत सं
मान आपला घेऊन असा तो वाद भंग करून ते-

मुंबईस परत येते झाले.

" श्रीशंकरस्वामीचीसंमतपत्रेंसनदानव्हत "

पाहा श्री शंकर स्वामीहीं या प्रभूंचे प्रार्थने करितां त्यांस प्राचीन ग्रंथाधार दाखवून अथवा स्वतः पाहून त्या प्रभूंस सांगीतलें असें कीं " त
" द्ग्रंथानुसार तुह्मीं चालत होते तसे तुह्मास वेस
" कल ब्राह्मणाहीं तसेंच चालावें ह्मणून-" अशीं सर्व संमत पत्रें त्यांचीं ग्रंथाधारें केलीं आहेत. यास्तव त्या पत्रास सनदा असें नाव ह्मणत नाहींत.

" पत्तन प्रभूंचा भक्तिभाव "

कसा आहे तो पहा. ते असें ह्मणतात कीं-"
" ब्राह्मण आमचे देव. स्वधर्मरीतीनें, राजमार्गानें,
" आणि ग्रहस्थचालीनें विधियुक्त आह्मास तेपूज्य
" होत. आपरवी आह्मीं त्यांचे पादांबुज वंदन क-
" रितों. इत्यादि " अशी यांहि वाट आज दिन पर्यंत जगप्रसिद्ध या प्रभूंची चालताहे.

आतां जे प्रभूक्षत्रिय आहेत त्यांचीं तर सर्व षोडशसंस्कारादिक कर्में ब्राह्मणा विरहित होत नाहीं. असा वेदशास्त्राधार आहे याजकरितां मागी

ळ सकळ पेशव्यांचीं पत्रें अमान्य झालीं आणि प्रभूंचीं कार्य प्रयोजनें सर्व ब्राह्मणाहीं तशीं चालू ठेविलीं पाहा त्यांचे तिसरे वसहाचे संमनपत्रीं

"गुरुशब्दाचानिर्णय."

१ प्रथम तर पिता गुरू होय २ चारी वर्णास तर ब्राह्मण गुरू आहे. ३ मुंजी बंधन करितो त्यास- तर- " गुरूजी " ह्मणतात. ४ मंत्रउपदेश करितो तो- " सांप्रदाय अथवा दीक्षा गुरु " ह्मणावा ५ लिपी आणि कळा शिकवितो त्यास तर- "पंतोजी" ह्मणतात, ६ जो अध्यात्म विद्या सांगतो. तो- "ज्ञानगुरु" होय ७ शेवटले दोन वर्णाचे गुरूस " गुरु गोंसावी-" ह्मणावें. आणि ८ राज्यांचा जो गुरु- " तो राजगुरु " होय. परंतु या- सर्वांस तर "श्रीजगद्गुरू-" पूज्य आहेत.

---

"स्वहितसार."

श्लोक-॥ स्ववर्णाश्रमधर्मेण नपसा हरितोषणात् ॥ ॥ टीका ॥ आदि सदाचार स्ववर्णाश्रमें॥

रमापती तोष वीजे स्वसंभ्रमें ॥

असें अपरोक्षानुभूतींत" साक्षात् शंकर स्वामी "ह्मणतात." तसेंच ज्ञानेश्वरींत-" आहे. पाहा ३ अध्यायाचे ९२ वे ओंवीपासून ते १२३ वे ओंवी पर्यंत.

## ॥ विद्वज्जनास प्रार्थना ॥

आतां माझी सकल विद्वज्जनास प्रार्थना अशी आहे कीं. मीं त्यां पुढें अल्पमति नमनरूप आहें. कसा ह्मणाल तर ओंवी पाहा.

सत्यासत्यतें पाहावें॥ गर्वरहीत वागावें॥
शोधसंग्रह करावें॥ शिष्यरूपें याजगीं॥ १॥

## ॥ स्वज्ञातीस अर्ज आणि हा ग्रंथ अर्पण ॥

आतां माझा अर्ज असा कीं स्वज्ञाति गंगेचे पादांबुजाची मीं अशीच निरंतर सेवा करावयास इच्छितों. आणि हा ग्रंथ संग्रह विद्वज्जनाचे सहाय्यानें जो जाहला. तो स्वज्ञाति गंगेस आचंद्रार्क पर्यंत अर्पण असो. हीच विनंती वारंवार- मिति चैत्र शुक्लपक्ष रामनवमी ९ आणि भौमवार शके १७८४ दुंदुभिनामसंवत्सरे.

—

संपूर्णकेला.

---

## ॥ इतिश्री पत्तप्रभू ॥
## ॥ लेखमणि समाप्त ॥

---

यांपुढें दोनकोष्टकेलि
हितों.

---

| कुळसंख्या | श्रीअश्वपतीचेपुत्रांचीनांवें | गोत्र | शाखा | प्रवर ⁂ | | | वेद | सूत्र | देव | आदिदैवत | कुलदेवी | उपनामें |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श्रीवसिष्ठ १ | श्रीअनुज | श्रीभरद्वाज | माध्यंजनी | श्रीआंगिरा | श्रीबार्हस्पत्य | श्रीभारद्वाज | यजुः | कात्यायनि | श्रीसूर्य | श्रीमाधव | श्रीप्रभावति | राणे. |
| २ | ״ देवक | ״ पूतमाक्ष | | ״ कित्ता | ״ गोरवती | ״ सांकृत्येति | | | | | ״ कालिका | प्रधान. |
| ३ | ״ पृथ | ״ वसिष्ठ | | ״ वसिष्ठ | ״ प्रमदा | ״ भारद्वाज | | | | | ״ चंडिका | कोठारे. |
| ४ | ״ ऋतुपर्ण | ״ काश्यप | | ״ काश्यप | ״ वत्सरा | ״ सीनेति | | | | | ״ महालक्ष्मी | नवलकर |
| ५ | ״ जय | ״ हरीत | | ״ आंगिरस | ״ बरीष | ״ यौवनाश्व | | | | | ״ योगेश्वरी | पत्तेराव. |
| ६ | ״ क्रशिष्णु | ״ इंद्रविष्णु: | | ״ वसिष्ठ | ״ पोरुकुत्स | ״ प्रासदसेव | | | | | ״ इंद्रायणी | धुरंधर. |
| ७ | ״ सोयाम | ״ ब्रह्मजनार्दन | | ״ काश्यप | ״ देवल | ״ जनार्दन | | | | | ״ कामाक्षी | आल्हाडकर |
| ८ | ״ सुमंत | ״ सौनत्य | | ״ वसिष्ठ | ״ वत्सरा | ״ वासिष्ठ | | | | | ״ एकवीरा | देसाई |
| ९ | ״ कौंडिन्य | ״ कौंडिन्य | | ״ भार्गव | ״ मैत्रावरुण | ״ कौंडिन्येति | | | | | ״ अंबिका | नायक |
| १० | ״ मंडूक | ״ मांडव्य | | ״ विश्वामित्र | ״ च्यवन | ״ प्रयावाज | | | | | ״ माहेश्वरी | मानकर |
| ११ | ״ कुशिक | ״ कौशिक | | ״ कित्ता | ״ देवरा | ״ नैध्रुति | | | | | ״ दुर्गा. | वेलकर |
| १२ | ״ मार्तंड | ״ विश्वामित्र | | ״ आंगिरस | ״ अघमर्षण | ״ कौशिकेति | | | | | ״ त्वरिता | व्यवहारकर |

⁂ पाहासंस्कृतगोत्रप्रवरमंजरी अथवा दर्पणग्रंथीं.

| कुलगुरु | | ॥श्रीकामपतीचे पुत्रांचीं नांवें | गोत्रें | शाखा | प्रवर ∗ | | | वेद | सूत्र | देवत | आदिपुरुष | कुलदेवी | [illegible] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श्रीअत्रि | १ | श्रीशाम | श्रीच्यवनभार्गव | माध्यंजनी | श्रीविश्वामित्र | श्रीदेवरा | श्रीत्रिपुरा | यजुः | कात्यायन | चंद्रमा | माधव | श्रीएकवीरा | रणजित |
| | २ | ॥ पृथु | ॥ गोतम | | ॥ उसत्र | ॥ देवदत्त | ॥ गोतमेति | | | | | ॥ वज्राई | गोरक्षकर |
| | ३ | ॥ ब्रह्मा | ॥ शांडिल्य | | ॥ कौडिन्य | ॥ मैत्रावरुण | ॥ शांडिल्येति | | | | | ॥ वडजाई | राव |
| | ४ | ॥ श्रीपति | ॥ देवदत्त | | ॥ आंगिरस | ॥ अंबरीष | ॥ यौवक | | | | | ॥ जोगाई | जयकर |
| | ५ | ॥ पौंडरीक | ॥ मार्तंड | | ॥ वसिष्ठ | ॥ शशि | ॥ शौनत्य | | | | | ॥ ताराई | धराधर |
| | ६ | ॥ वज्रदंष्ट्र | ॥ जमदग्नि | | ॥ आंगिरस | ॥ वरूक्ष | ॥ पार्श्वेत | | | | | ॥ जोगेश्वरी | नवपदे |
| | ७ | ॥ श्रीपाल | ॥ नानाध्य | | ॥ कित्ता | ॥ बार्हस्पत्य | ॥ नानाध्येति | | | | | ॥ कनका | कीर्तिकर |
| | ८ | ॥ शाल्मलि | ॥ मुद्गल | | ॥ कित्ता | ॥ मीषवर्म | ॥ कौंडिण्य | | | | | ॥ घंटाई | अजिक |
| | ९ | ॥ पार्थिव | ॥ वाणाक्ष | | ॥ भार्गव | ॥ भार्गस्व | ॥ मुद्गल | | | | | ॥ चंडिका | धैर्यवान |
| | १० | ॥ वासुकि | ॥ भार्गव | | ॥ वसिष्ठ | ॥ विश्वामित्र | ॥ अगस्त्य | | | | | ॥ वडजाई | सेनाजित |
| | ११ | ॥ सुरथ | ॥ उपमन्यु | | ॥ आंगिरस | ॥ बार्हस्पत्य | ॥ भारद्वाज | | | | | ॥ जातिका | विजयकर |
| | १२ | ॥ गज | ॥ महेंद्र | | ॥ कित्ता | ॥ पौलस्ति | ॥ वादरथ | | | | | ॥ वज्राई | त्रिलोकेकर |
| | १३ | ॥ आदि | ॥ पौलस्ति | | ॥ भार्गव | ॥ देवरा | ॥ नैध्रुति | | | | | ॥ जीवेश्वरी | प्रभाकर |
| | १४ | ॥ श्वेत | ॥ मार्ग्य | | ॥ भृगु | ॥ देवदत्त | ॥ गोतम | | | | | ॥ एकवीरा | राजकर |
| | १५ | ॥ वंश | ॥ वैशंपायन | | ॥ व्यास | ॥ पराशर | ॥ वैशंपायनेति | | | | | ॥ हरडाई | आनंदकर |

∗ पाहा संस्कृत गोत्र प्रवरमंजरी अथवा दर्पणग्रंथीं

## श्रीहरीस प्रार्थना.

॥श्लोक॥

---

मंगलंग्रंथकर्तुश्च, वाचकानांचमंगलं॥
मंगलं प्रभुजातीनां. मंगलंमंगलंकुरु॥
॥ १ ॥

असानित्य निरंतर श्रीहरि
चरणीं
माझा अर्ज आहे.

---

॥ श्रीः ॥

# सूचना

या भरत खंडीं क्षत्रिय वर्णा विषयीं मीं अति लघु शोध केला त्यांत मला जे. क्षत्रिय ज्ञातीचे आह्मीं आहों असें दुसरे ह्मणणारे सांपडले त्यांची मी एथे विल्हेवार नावें लिहितों.

उरसक्षेत्रकर.
उग्र.
कातारी
कायत.
कायस्थ
क्षत्री
चोकळशी
चवाण
जनकवंशी.
जनवा
ठक्कुर
ठाकूर
दयणी
धुरू
ध्रुववंशी.

पांचकळसी
भाट्ये
ब्रह्मक्षेत्री
मुलतानी
यदुवंशी
रघुवंशी
रजपूत
राणा
राठोर
राहा
लुवाणा
सगरवंशी
सूर्यवंशी
सोमवंशी

याप्रमाणें २९ आहेत.

## ह्या जगांत काय दुर्लभ आहे.

दुर्लभ मानव देह त्यांतही दुर्लभ भक्त कि-
तेक जिणें ॥ दुर्लभ त्यांत हि संतसमागम-
काय जिणें हरिभक्तिविणें ॥ आसहि हरिप्रि-
यजे हरिचे प्रिय भेटति ज्या जगदात्मपणें ॥
दुर्लभ दुर्लभ तो म्हणे वामन जे परशोधि-
ति आत्मगुणें ॥ १ ॥ ॥

---

शामराव मोरोजी कृत ग्रंथ.

| | |
|---|---|
| राजावलि | क्षत्रियवंशोद्भममाला. |
| काशिप्रकाश | पतनप्रभुलेखमणि. |
| ग्रंथालय. | हीं दोन्हीं लेणीं आहेत |

श्रीहरिः श्रीहरिः श्रीहरिः